MHKO100008992018

**<u>आदेश निशाणी क्र. ५१</u>**

१. वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ प्रमाणे दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र. ७(क) हिचे नाव लक्ष्मी विठू ऐवाळे (मांग) असे नसून लक्ष्मी दुंडाप्पा दावणे(मांग) असे असल्याचे बेलीफ रिपोर्टवरून समजून आले. तरी प्रतिवादी क्र. ७(क) च्या नावामध्ये लक्ष्मी विठू ऐवाळे(मांग) ऐवजी लक्ष्मी दुंडाप्पा दावणे (मांग) अशी दुरूस्ती करण्यास परवानगी मागितली आहे. सदर दुरूस्तीमुळे मुळ दावेचे स्वरूपात काहीही बदल होणार नाही. सबब वादी यांनी सदरचा अर्ज मंजूर करणेत यावा व सुचविलेली दुरुस्ती दावेत करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जास आपले म्हणणे सादर केले आहे व असे कळविले आहे की, सदरची दुरूस्ती पुर्णपणे चुकीची आहे. सदर दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूपात बदल होणार आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज रक्कम रू. ५०००/- चे कॉस्टसह नामंजूर करण्यात यावा.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे. अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले.

५. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द हक्कज्ञापनासाठी, वाटपासाठी व कायम मनाईकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र. ७(क) च्या नावामध्ये लक्ष्मी विठू ऐवाळे(मांग) ऐवजी लक्ष्मी दुंडाप्पा दावणे (मांग) अशी प्रस्तावित दुरुस्तीची मागणी केली आहे. निशाणी ४२ सोबत दाखल बेलीफ रिपोर्टचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. ७क यांनी त्यांचे लग्नापुर्वीचे नाव हे लक्ष्मी बाप विठू आयवाळे (मांग) असून लग्नानंतर सासरकडील नाव लक्ष्मी दुंडाप्पा दावणे (मांग) असून सदर नाव दुरूस्त होवून आलेशिवाय सदर समन्स व नक्कल घेणार नाही असे सांगितल्याने समन्स व नक्कल प्रत आल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रतिवादी क्र. ७क चे लग्नानंतरचे नाव लक्ष्मी दुंडाप्पा दावणे (मांग) असल्याचे प्रतिवादी क्र. ७क चे म्हणणे असल्यामुळे तशी दुरूस्ती होणे आवश्यक आहे. वादी यांनी मागीतलेली प्रस्तावित दुरुस्ती ही मुळ दाव्याशी संलग्न व तांत्रीक स्वरुपाची अशी आहे. वादी यांचा अर्ज मंजूर केल्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सबब सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) वादी यांनी दाव्यात १४ दिवसांत अर्जाचे अनुषंगाने दुरुस्ती करुन घ्यावी व दाव्याची दुरुस्ती प्रत सत्वर दाखल करावी.

३) या अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ठ करण्यात येत आहे.

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.02.04 16:57:15 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०४/०२/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज